म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ........ काव्य
सं. क्र. २६०४

## अस्तित्व

शब्दही पेटत असतात
तेव्हापासून
माझंही मन
पेटाय लागलं
संस्कृतीच्या पायाखाली
गुलामत्वानं चिडलेलं
मनातलं मन
भडकाय लागलं

पोथी....पुराणं
बायबल....कुराणं
वाचून काढली
मनुस्मृतीची ग्रंथसंपत्ती
पडताळून पहावयास शिकलो
स्वतःचं स्थान
जाणायलापण शिकलो

वर्णभेद, वर्गभेद, पंथभेद
भेदाभेदांची संस्कृती
जाळायलापण शिकलो,

शब्दही पेटत असतात
तेव्हापासून
माझंही मन
पेटाय लागलं
पेटलेल्या शब्दांनाही
स्वतःचं अस्तित्व
कळायला लागलं.

# दस्तऐवज

देवेन्द्र खंडारे

REFBK-0026081
REFBK-0026081

आमचे दर्जेदार
कवितासंग्रह

चिन्मयी
**बा. भ. बोरकर**

बोरकरांची प्रेमकविता
**संपादक : डॉ. रा. चिं. ढेरे**

मराठी प्रेमकविता
**संपादक : शेळके-ढेरे**

कळ्यांचे दिवस फुलांच्या राती
**शान्ता ज. शेळके**

तोच चंद्रमा
**शान्ता ज. शेळके**

झोपेचा गाव ( बालगीते )
**शान्ता ज. शेळके**

मंझधार
**अनुराधा पोतदार**

यक्षरात्र
**अरुणा ढेरे**

राजघाट
**अरुण शेवते**

गाथा
**फ. मुं. शिंदे**

आई आणि इतर कविता
**फ. मुं. शिंदे**

सुरेश एजन्सी पुणे

# दस्तऐवज

देवेन्द्र खंडारे

REFBK-0026081
REFBK-0026081

सुरेश एजन्सी पुणे

Dastaivaj
Marathi Poems
by Devendra Khandre

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

© देवेन्द्र खंडारे

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
१४ जानेवारी १९९०

मुखपृष्ठ
चंद्रमोहन कुलकर्णी

किंमत पंचवीस रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय,
४६१/४, 'शिव-पार्वती',
सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

आधिभौतिक जगात जीवन जगण्याला
ज्यांनी मला नवा अर्थ प्राप्त करून
दिला ते माझे ज्येष्ठ धम्मबंधु
प्रा. केशव मेश्राम
यांना आदरपूर्वक

मराठी ग्रं… संग्रहालय ठाणे
२६०४
काव्य २६८८
१०/३/८०

## एक निवेदन

लौकिक अर्थानं हा माझा दुसरा कवितासंग्रह. या संग्रहातील माझ्या कवितेविषयी मी काही सांगावं, असं मला वाटत नाही. किंबहुना माझी कविताच आपणाशी संवाद साधू पाहात आहे. संवादातूनच ती स्वतःच्या जीवनाचे बरेवाईट अनुभव व्यक्त करते आहे.

— देवेन्द्र खंडारे

पूर्वप्रसिद्धी

अधिष्ठान, अस्मितादर्श, कविता-रती, पूर्वा, लोकप्रभा व, मुंबई आकाशवाणी ( साहित्य सौरभ ), मुंबई दूरदर्शन इ.

ऋणनिर्देश

प्रा. केशव मेश्राम / डॉ. गंगाधर पानतावणे / के. एस. सरकटे / अरविंद सरकटे
प्रा. दामोदर मोरे / डॉ. सदा कऱ्हाडे

## अनुक्रमणिका


धुकं १
अभंग २
रक्तशोषितांनो! ३
लाकडं ४
सारं काही मला टाळून ५
डोळे ओले करीत राहिलो ६
बुबुळं ७
भावना ८
माणूस १०
आंतर्वेदना १२
मला गहाण ठेवायचे नाकारले आहे १३
दक्षता १४
पसारा १५
दुष्काळ : एक अनुभव १६
दोस्तहो १७
वृक्ष १९
चेहरे २०
भिकारी २१
प्रत्येक झोपडीच्या हातात... २२
नांद २३
किती दिवस २४
एक भौगोलिक काल्पनिक रेषा २५
वर्तुळ २६
ते कोण...? २७
स्वतंत्र देशात माझ्या २८
महात्मा जोतिबा फुले २९
निर्धार ३१
प्रकाश ३२
दिवस असा उजाडतो ३३
सामना ३४
उंची ३५
जगाची रीत ३६
ऑपरेशन ३७
तुमच्या निर्वाणानंतर ३८
तू, मी आणि पहाटपक्षी ४०
सावली ४१
मी आणि निसर्ग ४२
पापण्यांच्या आड ४३
मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराची मनोव्यथा ४४
पानगळ ४६
घुशी आणि राष्ट्रीयत्व ४७
ते दिवस ४९
वाटचाल ५०
रस्ता म्हणतो ५२
फोटो ५३
आयुष्याची बेरीज जुळवताना ५५
स्वातंत्र्यदिन : एक आनंदोत्सव ५६
सर्पांचा विळखा ५८
काळाच्या कराल दाढेखाली ५९
ठिगळ ६१
एक कविता : तीन रूपे ६३
माझा बाप ६४
स्वागत्याचे स्वगत ६५
देशाला या वाकवू नका ६७
स्थान ६८
का? ६९
कळत नसावे का? ७०
तक्रार ७१
अस्तित्व ७२
नम्रता ७४
दोन चिंतनिका ७५
काळीज ७६

मरण मेल्याची आमुच्या
कळवा जनात खुशाली
मरणात जगतो आम्ही
उभ्या पेटवीत मशाली

## धुकं

चुलीतल्या ओल्या लाकडांचा धूर
घरभर गच्च भरावा
तसं सर्वत्र पसरलेलं पांढरंफट्ट धुकं
...जणु पांढरा गर्द काळोख...!
तसे या गावचे जुने जाणते डांबरी रस्ते...
धुकं पांघरून गप्प बसलेले
स्मशानात मौन पाळल्यासारखे थंड...शांत
डबडबलेल्या घाण पाण्याच्या बेटाबेटांवर
कोंदट धुकं दाटलेल्या काड्यांमधून फुटणाऱ्या—
कृमी-कीटकांच्या किंकाळ्या
सागरातून, खाड्या-खाड्यांवर
मोर्चे वळवणारे विषारी जंतू
तृष्णेचे भक्ष्य शोधत फिरतात
ते धुक्यात डुंबत असतात अन् धुकं आत-बाहेर अधिकच
गडद होत जातं
दिव्यावर काजळी चढल्यासारखं
तेव्हा सूर्यकिरणांच्या प्रखर पदार्पणासाठी अन् स्वागतासाठी
गावकुसाबाहेरची वस्ती
डोळ्याच्या मशाली तेववीत असते.

## अभंग

केसाने हा गळा
कापणारे लोक
झाले इथे खूप
...जागोजागी

कठीण चालणे
कठीण बोलणे
त्यांच्या मनमाने
...वागलो न

व्रतवैकल्याचा
देव त्यांच्या दारी
दुष्टपणा उरी
...इतिहास

नव्या विचारांची
घेतली मशाल
मरण खुशाल
...आले जरी

मराठी ग्रं० संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.

## रक्तशोषितांनो !

सडू द्या असेच प्रेत माझे जिवंतपणी तर याहून सडलो होतो
कडू औषधाचे अश्रू गाळीत तुमच्या वळचणीत पडलो होतो
राग कोणावर अन् कशाला तुमच्या संस्कृतीची आगळी चाल आहे
धर्मग्रंथांना गोंजारण्यात ज्ञान कसले पिढीजात मृत काळ आहे
चोरट्यासारखी लाचार भक्ती कधीच गायली नाही पोट भटजीपुढे
पायरीपायरीवर अडकवलेत चांडाळ म्हणून आमच्या वाटचालीत ज्यांनी कडे
वाळूत तडफडणाऱ्या माशासारखे जगलो भक्षकांचे लक्ष होऊन
येथल्या गिधाडांना खुशाल झिंगू द्या लचके तोडत मांस खाऊन
खडकाळ देहावर खरडत राहिली उम्रभर येथल्या बाह्य साधकांची झिंग
धगधगणारा शिलारसही थंडावला निद्रिस्त ज्वालामुखी सम उधवून गुह्यबिंग
विजेच्या शॉकसरशी विद्रूप होऊन संपून गेलं सळसळणारं आभाळपण
रक्तशोषितांनो ! मोजावे लागतील दु:खाश्रूंचे किंमती मोल खणाण्खण.

## लाकडं

केवळ भुकेची आग विझविण्यापुरतीच
आग उगणारी
जीवनवृत्ती नाही या लाकडांना,
खरं तर ह्या आहेत :
श्रमपरिहाऱ्यांच्या तप्त तळहातावर
सार्वजनिक जीवनाची जीवंत भाकर शेकविणाऱ्या
रित्या चुलीमध्ये बौद्धिक जाळ पेटविणाऱ्या काड्या.

अंतर्बाह्य
ठणठण वाळलेली ही लाकडं
वेडीवाकडी असली तरी
ढणढणत असतात एकरूप होऊन
खरं तर होरपळतानाही त्यांच्या अंतरंगातून
तडतडणाऱ्या लाकडांचा ऐक्यध्वनी
तुमच्या वेदमंत्रांहूनही श्रेष्ठ असलेला

रखरखीत उन्हानं
जीवाच्या काड्या होऊन पिचलेल्या
लाकडी सापळ्यांच्या मोळ्यांचा
पान खाऊन थुंकणाऱ्या पैशात तुम्ही केला अनेकदा सौदा
ढोबळ पैशासारखी तोंडातली तंबाखुची थुंकी फेकीत जमिनीवर

जुळवता तंबाखूच्या पिचकारीबरोबर लाकडाचं मोल
आता हीच लाकडं येथल्या मातीत रुजून
चंदनी सुगंधानं दरवळत आहेत...
बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचा...
गौतमबुद्धाच्या विचारांचा...

मराठी ग्रंथ संग्रहालय
२६०४
क्रा. क्र. २६६८९
फार्च्य १७३१९
शाखा

## सारं काही मला टाळून

कष्ट उपसणाऱ्या हृदयसागरात
उचमळत असते रक्त
नित्य जीवाचं पाणी पाणी ऽऽ पाणी होऊन
अन् त्या पाण्याची उष्ण वाफ
डोळ्याच्या कडाकडांवर दाटून येते
अश्रुंचे थेंब-थेंब होऊन
त्या थेंबाच्या संतप्त धारा
पावसाळी मौसमाचा पाऊस होऊन वाहताना
खळखळून वाहतात नद्या, नाले, तळी अन्
फुलून येतं दूरचं शिवार
भन्नाटपणे उडत असतात वासनेचे पक्षी
आकाशाला गवसणी घालत रानोमाळ
पांधीत पाय रुतणाऱ्या चिखलातून हुंदडत असतात
पाऊस अंगा-खांद्यावर घेऊन
हसत खिदळत माजुर गावठी जनावरं
मला मात्र लोळवत सुटतं खट्याळपणे मोसमी वारं,
मी तर झडत असतो—पडत असतो—
इतरांसाठी जीर्ण होऊन,
येथली हिरवी राई फुलत असते
सारं कसं मला टाळून.

## डोळे ओले करीत राहिलो

हृदय हरवल्या माणसांना रस्तोरस्ती थांबवत राहिलो
भौतिक दु:ख भोक्त्यांचे दु:ख उगी शोधत राहिलो

पायात पाय अडकलेले पथ अन् स्वैर भन्नाट दिशा
त्या दिशांचे क्षितिज कोठे उगीचच बघत राहिलो

उन्हाळलेल्या सूर्याने पेरावेत जागोजागी निखारे
ते निखाऱ्याचे जिणे निखाऱ्यांना विचारत राहिलो

बहरल्या वृक्षवेलींचा कोणी बहार लुटलेला
पान झडत्या झाडांचे शिशिर गीत गात राहिलो

आकाश तरंगणारे उडून जवळून गेलेत पक्षी
विरह गीत गाता डोळे ओले करीत राहिलो

## बुबुळं

थकलेल्या बुबुळांवर
पापण्यांचं पांघरूण ओढून भरभरून विसावावं
असं निवांत... शांत स्थळ राहिलंच कुठं?
मान खाली झोकून सतत जगावं लागतं
शरणागत फाटक्यातुटक्या झोपड्यांना
गोवऱ्यांच्या धुव्वार धुक्यात सकाळ संध्याकाळ
भुकेजलेलं पोट जेव्हा अग्नीसारखा उर जाळतंय
तेव्हा झोपडीच्या कुजट-कुबट सणकाड्याही
क्रांतीची आरोळी ठोकायला लागतात;
तेव्हा पापण्यांच्या पांघुरणाबाहेर पडलेली बुबुळं
आभाळभर जीवन जगण्याच्या शोधात फिरतात...

## भावना

विस्तीर्ण पसरलेल्या जलाशयात
फेकावा जोरकसपणे एखादा खडा
अन् उठवावेत पाण्यावर अनेक गोलाकार वर्तुळाचे तरंग
तसे माझ्या अंतरमनाच्या खोल खोल मनावर उमटलेली
भावनांची असंख्य वर्तुळाकार वलये,
खरं तर
माझ्या अंतर्मनातून उफाळणारी भावनारूपी वेदना
माझी नसतेच मुळात
ती असते माझ्या समाजाची
काळीज चर्रर् करणाऱ्या दु:खाद अंत:करणांची
ती भावना वेदना घेऊन कण्हत फिरते
स्वाभिमानी प्रतिष्ठित जीवनाच्या उंचच उंच क्षितिजाचा शोध घेत.

होय;
ती भावना चालत असते
स्वत:चा तोल सांभाळीत
तारेवर चालणाऱ्या डोंबाऱ्याच्या कसरतीप्रमाणे
कधी त्या भावनेला येते
विजेसारखी सळसळती तीव्रता
बाहेरच्या रखरखीत उन्हात मोटारगाडीच्या इंजिनाने
एकदम पेट्रोलचा भडका उठवावा तशी

हे जग केवळ भावनेवर चालत नाही हे मला मान्य आहे
पण येथे
माणसाच्या माणूसपणाची अस्मिता अशीच जळत राहिली तर
माणुसकीचा मानवी जाहिरनामा फक्त–
कायद्याच्या कागदी चौकटीपुरताच फ्रेम करून
ठेवण्यात उपयोग काय ?
येथल्या विषम जातीच्या धर्मांध वावटळी वाऱ्यावर फडफडणाऱ्या
भारतीय ध्वजावरच्या अशोक चक्राची गती
कोण खुंटीत करतो आहे
बाबासाहेबांनंतर
कोणापुढे उलगडावी
अख्या हृदयाला होरपळविणारी
माझी अन् माझ्या बांधवांची
वेदनेनं विव्हळणारी भावना ?

## माणूस

ऐका जन तुम्ही
नवल दाटले
आयुष्य भेटले
...मानवाचे

माणूस येथला
माणूस कोठला
माणूस विटला
...माणसाला

नित्य चाले इथे
संस्कृतीचा ऱ्हास
कोणा नाही कास
...माणसांची

कुत्र्यासम जिणे
माणूस जगतो
हाडे चघळतो
...माणसांची

अहंकार भारी
माणूस पोसला
जनात वसला
...स्वार्थीपणा

नारीस अजूनी
शुद्रत्वाचे कडे
क्षणोक्षणी झडे
...अत्याचार

संघटित होतो
जातीचा माणूस
विरोधाचा वास
...उग्र ज्याला

राजसत्ता येथे
जातीशी बांधली
कोणी नाही वाली
...अन्त्य जना

शोध घेऊ कोठे
नव्या मानवाचा
ज्याची नित्य वाचा
..जनहिता

## आंतर्वेदना

थरथरत असते
खाडीतल्या संथ पाण्यावर
हवेनं तरंगणारी पाणवाट
मृगजळासारखी दिशाहीन दिशादिशांतून
तशीच पायाखालची वाट
जीवनाचा न उमगणारा नि न उजळणारा
चढत जाते अंधारगर्भ गुहाघाट

त्यातला मी : एक प्रवासी
सांसारिक जीवनाचं बोचकं गाढवासारखं खांद्यावर घेऊन
ठेचाळलेल्या तप्त रक्तबोटात भरवीत गारवा
जीव गुदमरलेल्या निराशेलाच सुखद दिलासा देत

पण मला
माझे जगणेच अस्वस्थ करून टाकते
माझ्या शरीरातली आंतर्वेदना
जी पिढ्या न् पिढ्या आवळल्या गेली
शोषणाच्या ताणतणावाखाली
मी उभा
जळत्या सुंभात सक्रीयतेची आग धुमसवीत

## मला गहाण ठेवायचे नाकारले आहे

कालपर्यंतच्या माझ्या
ओल्याचिंब नेत्रकडांनी
खंबीर हिमालयासारखे
ऋतुचक्राचे झेल घेत
पुढेच जायचे ठरवले आहे
अंत:करणात धुमसत जाणाऱ्या शब्दांनी
मला गहाण ठेवायचे नाकारले आहे.

पाठीची ढाल करून
कासवासारखा जगतोय
दु:ख तडफडणाऱ्या डबक्यात
        शरीराला एकवटून
अख्खं शरीरच आता डचमळाय लागलं
समुद्राची गाज होऊन,
आभाळाचे गाणे मला जे गाऊ देत नाहीत
त्यांच्या नजरकैदेतून,
शाश्वत मूल्यांचा शोध घेत
मी डोळे फोडून चालतो आहे,
अंत:करणात धुमसणाऱ्या शब्दांनी
मला गहाण ठेवायचे नाकारले आहे.

## दक्षता

येथल्या निर्मळ जलाशयात
एका पायावर भक्तीचं ढोंग पांघरून
उभे असलेले ध्यानस्थ बगळे
टपलेले असतात जीवन-खेळ जगणाऱ्या माशांवर

जलाशयाच्या उंच किनाऱ्यावर
कधी कावळ्यांचा मोर्चा सरकत जातो तेव्हा
ते सोयीस्कर ढोंगीपण दडवून अदृश्य व्हायला लागतात
त्यांच्या सोयीच्या विस्तीर्ण आकाशात
        दिशादिशांच्या बोगद्यातून
...घारीसारखी समंजस नजर जलाशयावर एकवटून.

...कावळेही आता उंच उडायला लागलेत
त्यांच्या विकृत मनाचा वेध घेत
प्रत्येक जीवाणुंना जीवन जगता यावं
याची दक्षता बाळगून

## पसारा

फोड फुटला फुटला
देहातून पाणी थेंबे
तळव्याच्या भिंगातून
दाह चेहऱ्याला झोंबे

चिपाडाच्या खाणाखुणा
नाही अजून बुजल्या
पाय ओकत चालले
रक्त-मातीत चिंब्रल्या

वळ उठले उन्हाचे
उन्हाळल्या तनुवर
उष्ण अश्रूंचा गळतो
दोन्ही डोळ्यांतला नूर

नाही थांबता थांबेना
मन सोसाळू हा पारा
दु:ख-स्मृतिंना वारून
कुठे ठेवू हा पसारा ?

## दुष्काळ : एक अनुभव

बाहेर धो धो पडणाऱ्या पावसाच्या तालासुरात
जर्मलच्या पातेल्यात
खद्‌खद् करीत
अन् ओल्या दुष्काळाचं गाणं ऐकवीत
उष्ण वाफाऱ्यात उकळणारी तरोट्याची भाजी
असते; अन् हसते; आपल्याच बंदिस्त नादात...!

तेव्हा चुलीमधली ओली लाकडं
सनईच्या सुरावर
तडतडणारा गुळ
घरभर उधळीत असतात
वासाट्यावरून घरंगळत घरात ठिपकणाऱ्या पावसाळी तारा
अख्या घराला ओलं करून
अंगणभर लोळत जातात...
...आम्ही मात्र असतो
जिवंत मरण अनुभवीत
मध्यरात्रीच्या अंधुक कोपऱ्यात
उकडलेल्या तरोट्याच्या भाजीचा
न खाऊ वाटणारा एक-एक घास गिळीत

## दोस्तहो

दोस्तहो...!
याच ओंजळीत झेलतोय
कित्येक बर्बाद झालेले
आयुष्याचे क्षण
जेव्हा गुलाम म्हणून सलाम करावा लागला
तेव्हाच हद्दपार झाल्यात
त्यांच्या थोतांड कलाकृतीस आव्हान करणाऱ्य
आमच्या चिरेबंदी भावना.
त्यांच्या थुंकीत गोठलेल्या जीभेशी
मुकाबला करीत
राजघाटावर फुलांच्या गुच्छात लटकलेली
पापभिरू लक्तरे उघड्यावर पडलीत तेव्हा
महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरूंचा
होरपळत होता आत्मक्लेश
आणि त्यांची ' रामराज्या'ची कल्पना
दिल्लीच्या मखमली तक्तावर लोळत होती
झिंगलेल्या मदिराप्राशनात
...सुभाष, भगतसिंग, लजपतराय
यांनी वाहिलेले रक्ताचे पाट
चाटत होते पार्लमेन्टमध्ये स्वत:
भारताची लढाई न लढणारे
राक्षशी भक्षक
भारताची विकास योजना आखताना

काल झालेल्या माणसांच्या जनगणनेत
कित्येक येशू, मनू, पैगंबर भेटले
ज्यांनी चालवले धर्माच्या नावावर
व्यवहारवादाचे खोटे जिणे
ज्यांच्या ओठा-पोटात
शोषितांच्या क्लेशमय जिवित्वाचा विचारच नव्हता
म्हणून—
कित्येक बर्बाद झालेले आयुष्याचे क्षण वेचत
आम्हीच आक्रमतोय आमचा नवा मार्ग
दोस्तहो...!
आपली आयुधे सज्ज ठेवा.

## वृक्ष

पायाखालची जमीन सैल
आभाळ तर दूरच दूर
वाळवंटात रुजलेल्या आसवांचा
वाहत असतो नित्य पूर

कित्येक वर्षे आली अन् गेली
खूप सोसला उन्हाचा दाह
थंडीने भरतात कापऱ्या देहात
पावसाळ्याचे अनेक शह

आले पक्षी अन् गेले पक्षी
नाही ठेवले कोणी भान
विसाव्यालाही झटकून सारे
मोकळे झाले घेऊन रान

कण्हत-कण्हत जगतोय मी
हड्डी-हड्डी झाली ठिसूळ
माझे म्हणून उरलेच काय ?
कोंभासाठी जपतोय मूळ... !

## चेहरे

दररोजच्या वेळापत्रकाप्रमाणे
मला दिसतात
अबोल ओळखीचे बोलके चेहरे
रेल्वे प्लॅटफॉर्मवर... डब्यात... पायी ऑफिसला जाताना..
येताना... रस्त्याच्या घाईगर्दीत
आपल्याच विचारात
असंख्य पाय झेपावत चालणारे असंख्य चेहरे
सकाळी फुलांसारखे फुललेले आणि
संध्याकाळी सूर्याच्या काळोखी अस्ताप्रमाणे मळलेले.

मी दररोज चेहऱ्यांचा अभ्यास करतोय
चेहरे दररोज बदललेले दिसतात
काही पावडरच्या धुक्याखाली लपलेले असतात,
तर काहींचे गॉगलखाली डोळे झाकलेले असतात,
काही रंगीबेरंगी पोशाखात गुरफटलेले असतात.

त्या चेहऱ्यांना अजून मनाचा अभ्यास नाही
त्या चेहऱ्यांवर अजून मनांचा अभ्यास नाही
पायाखाली चेंगरणाऱ्यांचीही त्यांना पर्वा नाही
हे चेहरे फक्त धावत असतात स्वतःची सुरक्षा ठेवून
एकमेकांना धक्के-बुक्के देत
एकमेकांचे धक्के-बुक्के घेत

## भिकारी

उपाशी पोटानं
लंगड्या काठीच्या संगतीत
थंडीनं हुडहुडणाऱ्या कटोरीला बिलगून
आंधळ्या जमीनीच्या अंथरुणावर
आभाळ पांघरून गुपचूप झोपावं,
पण—
झोपू देत नाहीत
पोटाला कुरतडणारी
अवयवांच्या रूपानं सर्वांगात सळसळणारी
        भुकेची श्वापदं,
अशा वेळी
डोक्यात काजळलेल्या खाचखळग्यांचा
अंथरुणावर वितळणाऱ्या श्वासाशीच
कण्हत कण्हत चालत असतो जीवन-संवाद

बेस्ट गाड्यांच्या स्टॉपवर
त्याला मिळालेली विटलेल्या विड्यांची थोटकं
थोडका का होईना जीवाला उष्मा देतात एवढेच !
त्यातूनही अख्खा काळ लोटून
पांढरीफट्ट सकाळ त्याच्या नशिबी उजाडलेली असते.
असंख्य बुटांच्या खाड् खाड् आवाजांच्या तालावर
पोटातलं भुकेचं तांडवही थकून गेलेलं असतं
धर्माला कवेत घेऊन धावणारी वस्ती मात्र
अंगभर त्याच्या अपंगत्वाला तुडवत जाते.

## प्रत्येक झोपडीच्या हातात....

उतरंडीच्या मडक्यात
चांदण्यांच्या रितेपणाच्या दाण्यांना
चाळत असतात गळून गेलेले भेगाळ हात
जीर्ण झालेल्या पुटकुळ्यांची एक-एक गाठ उकलून.
गाठोड्यावर विटलेली असते
धुकं दाटलेली धूळ
अन् गाठोड्याच्या सांदीकोपऱ्यातून सळसळते
कृमी-कीटकांचं झुरळांचं सबंध कूळ.
दिवस रात्र
घरात-बाहेर, बाहेर अन् घरात
आरपार हुंदडत असतो मोकाट वारा
घरंगळतात कुजलेल्या झोपड्यांचे अश्रू
फुटक्या लाकडी खोक्यांवर मडक्यांवर
सारवण ल्यालेल्या अख्ख्या घराच्या शोधक डोळ्यातही
तेव्हा अंगावर फाटकी गोदडी देऊन
अंगाखालची जमीन पाठ कुरवाळत असते
आत्मविश्वासाचा निखारा उजळणाऱ्या चिंतनशील चुलीच्या डोळ्यात
नवं तेज आकार घेतं
प्रत्येक झोपडीच्या हातात क्रांतीचं कोलीत ठेवून

## नोंद

हातात माती घेऊन
नाती जोडावयास निघालेला मी
रस्त्याच्या वळणावळणांवर भटकतोय

शेजाऱ्यांनी पेरलेले अनकुचिदार
वेशीभोवताल पायात बोचणारे काटे
पुराणीसारख्या टोचण्या देत
धिक्कारीत उपहास निखाऱ्यासारखा फुलवत असतात

दु:खद अनुभवांचे कडवट घोट गिळीत
माझ्यातलं निर्विकारलेलं पिंपळपान
वाऱ्यासवे खदखदून हसत म्हणतं–
' अरे वेडया तू कोठे म्हणून भटकणार आहेस
शाश्वत जीवनमूल्यांचा शोध घेत...
युगानुयुगे काजळलेल्या
अन् काटाळलेल्या टाचांखाली
पेरलेली अमानुषता कुरूप होऊन
सतत वाढतेच आहे
तू फक्त जपायला शीक
तुझ्या हृदयात तेवणारी
सबळ माणुसकीची वेदनामय तडफती ज्योत
अरे ! इतिहासाला घ्यावीच लागणार आहे नोंद...
तू जीवंत ठेवलेल्या माणुसकीची...!
जीवन जगलेल्या माणुसकीची...!'

## किती दिवस

किती दिवस बघावे डोळ्यांनी
वाळलेली झाडे अन्
—काटेरी गवताचे रानमाळ

किती दिवस चालावे आपलेच
पाय डोक्यावर घेऊन
—अंधार दऱ्यांचा तुडवीत काळ

किती दिवस कष्टावा हातांचा संघर्ष
सोने न्यावे लुटारूंनी
—आमचीच तोडून नाळ

किती दिवस पेरावी जिभेवर साखर-गोडी
कडूनिंबाचे बी रुजवीत
या मातीतला सरकतो फाळ

किती दिवस झेलावी त्यांच्या शब्दांची थुंकी
शब्दसामर्थ्यावर आमच्य
—जे घेत आले आळ

किती दिवस थोपवावे फुरफुरणाऱ्या बाहूंना
क्रांतीची मशाल घेऊन
—का पेरू नये जाळ... ?

## एक भौगोलिक काल्पनिक रेषा

आभाळाला ढगांचं ठिगळ
तसं माझं मढूल मन
न्यूनगंडाच्या चिखलात
वैफल्यग्रस्त अवस्थेत
        रुतून पडलेलं
माझी मलाच न ओळखता येणारी
स्वत:चा आस नसलेली
काळाच्या अक्राळविक्राळ जबड्यात
स्वत:ला झोकून देणारी
विज्ञाननिष्ठ
एक भौगोलिक काल्पनिक रेषा

## वर्तुळ

डोळ्यातल्या वर्तुळाने
स्वत:चेच वर्तुळ न्याहाळायचे नसते
पृथ्वीच्या वर्तुळाशी
आपले वर्तुळ जुळवायचे असते

डबक्यात दिसते आभाळाचे बांगडीएवढे वर्तुळ
विस्तीर्ण आभाळ तेव्हा
प्रतिबिंबात मोजायचे नसते

शाश्वत जीवनमूल्यांच्या मातीत अविश्वास पेरायचा नसतो
ऐहिक सुखाच्या मागे तेव्हा
सारे जग धावत असते

दिवे उजळणारी वस्ती मुद्दाम पोसते आंधळ्या अंधाराला
अंधारातल्या प्रकाशपुत्राने
तेव्हा ढगाआड लपायचे नसते.

## ते कोण....?

हा म्हणतो माझे ऐका. तो म्हणतो माझे ऐका.
बाबांच्या तत्त्वज्ञानाला छळतात ते कोण ?

हा म्हणतो इकडे बघा. तो म्हणतो तिकडे बघा.
बाबांच्या प्रतिमेला टाळतात ते कोण ?

हा म्हणतो येथे थांबा. तो म्हणतो तेथेच थांबा.
बाबांच्या तर्क ओघाला बांध घालतात ते कोण ?

हा म्हणतो मी नव्हेच ! तो म्हणतो मी नाहीच !
हा, तो, ते चा संघर्ष पाळतात ते कोण ?

## स्वतंत्र देशात माझ्या

स्वतंत्र देशात माझ्या मी स्वतंत्र आज नाही
जगावे म्हणून जगतो जगण्यात अर्थ नाही

क्रूर टाचांखालचा त्यांच्या फुटपाथ होऊन पडलो
किती विव्हळलो, झिजलो त्याचे गणित आज नाही

नंदीबैलासारखे सजलेत शहरी झकास रस्ते
झोपडी-झोपडीत अजून दिवा उजळला नाही

मोहळ उठावे तशा घोषवाक्यातल्या वल्गना
ज्या वल्गनाने भूक आमुची कधीच शमली नाही

समतेच्या नावाखाली जातीयवाद्यांचा हैदोस
माणसातला माणूस का अद्याप भेटला नाही ?

पुरते लपेटून घेऊ द्या हो स्वातंत्र्य निशाणाला
इज्जतीपुरतेही सांगू कसे ? वस्त्र मजला नाही.

## महात्मा ज्योतिबा फुले

हे महात्म्या,
तुझ्या वैचारिक व्यक्तिमत्त्वावर व व्यक्तित्वावर
जहराचं कालवण करणारी
अमानुषांची परंपरा अजून जिवंत आहे
प्राचीन कोराट वृक्षाच्या सावलीत राहून
दररोजच्या प्रकाशात जळणाऱ्या सूर्याचा
दाहसोस त्यांना काय माहीत...!
...ज्यांचं अख्खं ज्ञान
उपनिषदं, वेद, मंत्र अन् मनुस्मृतीच्या ढिगाऱ्यातच कुजते आहे
त्यांच्यात नाही काळ बदलविण्याचं सामर्थ्य
आश्रित होऊन जीवन जगणाऱ्या माणसाला
कुठलं आलंय बळ ?

हे महात्म्या
ज्यांच्याकडे सामर्थ्य असते
त्यांनाच डिवचत असते अन् गुरफटत असते
अंगभर पसरलेली अन् दुर्बळपणातही
सबळ असल्याचा दावा करीत
प्रतिगामी विचार सुरकुत्यांची जाळी
त्यांच्या जाळीत सापडणारे आम्ही तित्तर पक्षी नव्हत महात्म्या.

घरचा आड अस्पृश्यांसाठी खुला केलेल्या
जलाशयातल्या जीवन-विचारांचं
आम्ही मगरीसारखं रक्षण करीत आहोत
तुझ्या निर्भीक पाणवठ्याचं रक्षण करणारे
आम्ही भीम सैनिक...!

हे महात्म्या
तुझ्या कष्टप्राय वैचारिक खंदकांमधूनच तर
आम्हाला आमच्या डोक्यावरचं
तू उभं केलेलं भव्य क्षितिज दिसते आहे आता
माळरानावर बहरू लागल्या आहेत खुरट्या पालव्या
....झाडंझुडपं

तू लिहून ठेवलंस
निळ्या कागदावर अखंडाच्या रूपानं
येथल्या लुकलुकणाऱ्या ताऱ्यांच्या जीवनाचं ' अखंडत्व '
अन् प्रतिगामी अंधार-विचारांची सोबत घेणाऱ्यांवर
तू लगावलेस शेतकऱ्यांच्या आसूडाचे आसूडाचे फटके अन्
उभे केलेस ' गुलामगिरीचे बंड '
तुझ्या रूपानेच तर येथला सूर्य पाजळतो आहे
समतेचा प्रकाश...!
तुझ्या परिवर्तनवादी चळवळीतूनच
बाबासाहेबांनी घडवला नवा इतिहास

२६०४
२६१८१
काव्य १२।७।९०

## निर्धार

अश्रूंच्या तेलावर
डोळ्यातल्या अग्नीची मशाल पेटवली आहे
माफ करा
अंधारातून पुढचा रस्ता चालताना
तुमच्या डाव्या हाताच्या करंगळीच्या आधाराची तरी
काय आवश्यकता ?

कारण...
माझे हात तर आता स्वैरभर झपाटले आहेत
अन् अख्खं क्षितिज बोटांच्या वाती होऊन
प्रकाशानं तेजाळत आहे
१४ ऑक्टो. १९५६ च्या दीक्षाभूमीवरील
जीवन जगण्याचा
छातीमध्ये निर्धार एकवटून...!

## प्रकाश

हल्ली
माझं अस्तित्वच मी विसरून गेलो आहे

खूप प्यालो अंधार
इतका की
येथल्या ग्रहांनाही उजेड पचवता येऊ नये इतका.

मी ठरवलंय :
अजून खूप प्यायचा अंधार
आभाळ फाटलं तरी
सूर्य काळवंडून गेला तरी

पुढे कदाचित
याच अंतराळातून
प्रचंड प्रमाणात प्रकाश उधळीत
नवी ग्रहमाला आकाराला येईल
अन् माझ्या अस्तित्वालाही मग
स्वत:चा प्रकाश मिळेलच मिळेल.

## दिवस असा उजाडतो

दिवस असा उजाडतो रात्रीचा काळोख लेवून
आम्ही असतो निपचित पडलो बिछान्यावर व्याकूळ होऊन

माय पहाटेच उठते बापू दम टाकत राहतो
उकळलेले मीठपाणी घशाखाली ढोसत राहतो

माय बिचारी कण्हत कण्हत भांड्यामधी भरते पाणी
पहाटेच लावते शेजीबाई रेडिओमध्ये मधुर गाणी

लाल पिवळा होऊन येतो सूर्य उभ्या क्षितिजावर
दुरडीत नसते भाकरी अन् भिकारी असतो दारावर

माय जाते कामाला बापू मोळी घेऊन येतो
अर्धपोटी दिवसा आम्ही चांदण्यामात्र मोजत राहतो

बहिण माझी तरणीताठी लुगडं चोळी फाटलेली
अब्रूच्या चिंध्यांची जणू गाठ गाठ गाठलेली

कधी होते संध्या छाया ते काही कळत नाही
मायमात्र कण्हत असते डोळा काही लागत नाही

दिवस असा उजाडतो रात्रीचा काळोख लेवून
आम्ही असतो निपचित पडलो बिछान्यावर व्याकूळ होऊन

## सामना

नाही तरी ठळकपणे कोरलाच आहे
काळाच्या काळ्या पाटीवर
तुम्ही तुमच्याच पशुतुल्य जीवनाचा वारसा
यापुढे मात्र
तुमच्या भ्रष्ट कृतकर्म्या वारसदारांवर
डोळ्याचा जागता पहारा ठेवून वावरतो आहे.

शोषितांच्या शोषणाची रक्ताळलेली आतडी
लोंबकळलेल्या अन्यायजनक पोशिंद्यांकडून
आता फुटल्या जाणार नाही अनुकुचिदार सळईनेही
माझ्या डोळ्याचं आभाळ
ज्या आभाळानं फुलवलं तुमचं डोंगराळ जीवन
ते डोळ्याचं आभाळ
ढाल होऊन सज्ज झालं आहे,
तुमच्या हिंसक रक्तानं माखलेल्या तलवारीशी
निकराचा सामना करण्यास

## उंची

आभाळ-जमीन उंचीचं
मी कशाला गणित मांडू
कारण
जमिनीवरल्या पाण्यानंच
आभाळाला वाकवलं आहे...
जीवन फुलवणाऱ्या भूमीवरील पाण्यावर

मी बघतोय तरंगताना
आभाळपणाचे अनेक तुकडे

फुटलेल्या आरशांच्या तुकड्यात
छोट्या मोठ्या विविध आकार रूपात साकारलेली
माणसांच्या चेहऱ्याची उंची
व्यापक नि खुरटेपणाच्या प्रतिमा-प्रतिबिंबांना
चक्रावून टाकणारी

सरळसोट आभाळ चुंबणाऱ्या निकर्त्या ताडांनी
जीवनचैतन्य फुलविणाऱ्या
जमीन-लोळ्या भुईमुगाच्या झुडपांना हसू नये

तालेवार वाऱ्यासोबत
झावळडोयी झिपऱ्या झटकल्या म्हणजे
उंची प्राप्त होत नाही.

## जगाची रीत

मांडली तीन दगडांची चूल, तवा, चमच, थाटली, सराटा आणि भगोने
थाटले मोडक्या तोडक्या संसाराचे झोपडीत सांसारिक जिणे

व्यवहार व्यवहाराने खेळलो खर्चिक होणाऱ्या एक दोन पैशाची
करून काटकसर
आणीत गेलो दहा पैशाचे मीठ, चार आण्याची दाळ अन् चमचभर साखर

बरेच दिवस असेही काढलेत एक चड्डी, फाटकी पँट अन् एकच सदरा
साथीदारानेच कुजबुजावे, 'हा फाटकोजी एम. ए. झाला का रे खरा?'

झाले असे की जगणेच सारे पालटून गेले शेजारी पंढरपूरचे स्पृश्य
वारकरी असताना
त्यांनीच निकालात काढले तरीही जगतो आहे भोंदू जगात बुद्दू म्हणताना

मोडतोड होता ध्येयवादाची तरी कसाबसा चालतोच आहे
जीवन सावरीत
रात्र अंधार घेऊन सुन्न पडते, डोळे उघडेच असतात शोध घेत
जगाची रीती न्याहाळीत.

## ऑपरेशन

कंगव्याच्या कंगोऱ्यात
दररोज विंचरताना गळणाऱ्या डोक्यावरच्या केसांचे
तुटून यावेत तुकडे
तसे त्यांच्या डोक्यातल्या मेंदूतून
पूर्वप्राचीन ग्रंथांच्या पानापानांवर गिठळ्या होऊन
मानवी समूहांच्या सभोवार ठिपकणारे
अन् अद्याप न पुसल्या जाणारे नासक्या रक्ताचे डाग

खरं तर
त्या ग्रंथांच्या पानापानांवर व्यभिचारी विचार भाव होऊन पसरलेल्या
रक्ताच्या थारोळ्यावर
रासायनिक द्रव्य शिंपडायला हवं
किंवा लिहून घ्यायला हवी
त्यांच्याकडून नव्या विचारांची ग्रंथरचना
मानवी जीवन शांततेच्या
पांढराशुभ्र कोऱ्या करकरीत कागदांवर

पण त्या नासक्या रक्ताची
पकड एवढी घट्ट की
विज्ञानाच्या भट्टीत उष्ण द्रव्यात उकळूनही
ते रक्त डाग जात नाहीत अद्याप
पूर्वनियोजित
कुबट विचारांची दुर्गंधी सोडणाऱ्या
त्यांच्या सडलेल्या मेंदूचं
डॉ. बाबासाहेबांनी जसं केलं तसं ऑपरेशन करायला हवं
बुद्धमय जगाचं स्वप्न
आकार घ्यायला हवं

## तुमच्या निर्वाणानंतर

दुभंगलेल्या समाजपरिवर्तनाच्या व्यासपीठांवर
मी ऐकतोय अन् बघतोय
शब्दा-शब्दानं वर्णित झालेलं
तुमचं दुभंगून टाकणारं व्यक्तिमत्त्व
...ज्याने त्याने बंदिस्त केलेल्या फोटोंच्या चौकटीमध्ये !

त्या फोटोच्या चौकटीभोवती
चुकचुकतात पाली
अन् गोंग्ऽऽ गोंग्ऽ करून घोंगावणाऱ्या भ्रमराची
टणकपणे चढलेली असते वारूळरूपी
मातीच्या कणाकणांची जाळी
परिवर्तनवादी चळवळीत
अन् प्रतिगामी चळवळीतही
ज्यांच्या सुमंगल हस्ते
फोटोंचं भिंतीवर होत असतं अनावरण
तेव्हा त्यांनाच विचारत असतो तुमच्या विचारांची मौलिकता
पण उत्तरांना असतो प्रश्नांकित शृंगार !
" अरे बाबा काळ बदलतोय ना ? "
कोणाची उसंत आहे या व्यावहारिक समाजकारणात
फोटोंकडे अन् विचारांकडेही विशेष लक्ष द्यायला.

विभिन्न विचार मेंदूंच्या कटोरीत
खाद्यपदार्थांसारखे
ढकलले जातात, बाबासाहेब तुमच्या विचारांचे मोती,
व्यवच्छेदकांच्या दावणीला
एक कुरण समजून

बाबासाहेब,
तुमच्या निर्वाणानंतर
तुमच्या विचारातलं समाजजीवन जगण्यापेक्षा
आम्ही आमच्यातलंच जीवंत मरण उगाळून तर चाखत नाही ना ?
तुमचा फोटो
ठायी ठायी ठेवून... ?

## तू, मी आणि पहाटपक्षी

तू तेथे...
रखरखत्या उन्हात बसून
सारखी स्वत:ची कातडी सोलत रहावं
ते माझ्या अंत:करणातल्या
रक्तपेशींना मान्य नाही
म्हणूनच मी
आभाळपणाची सावली धरून
तुझ्या दु:खाशी
माझंही दु:ख एकरूप करतोय
मला बघायचंय
त्यांच्या निळ्या निळ्या आकाशात
एकत्र बागडणारे... उंचच उंच उडणारे
आपल्या अंतरवेलींना
स्पर्शून गेलेले पहाटपक्षी

## सावली

सावली–आपल्या बरोबर चालत असते
सावली–आपल्या बरोबर बोलत असते
सावली–उन्हात तळपणाऱ्यांना
जगण्याचा दिलासा देते.

झाडांखालची सावली
अनेकांना विसावा देते.
आभाळ छताखालची सावली
अनेकांचे संसार फुलवते.

सावली आपल्या बरोबर असते,
आपण सावली बरोबर असतो,
सावली कधी सदृश्य असते
सावली कधी अदृश्यही असते.

आपण आपल्या सावलीला विसरू नये
आपण आपल्या सावलीला फसवू नये

काळाच्या गतिमान वाटेवर
सावली आपली प्रेरक शक्ती असते
दु:खाश्रत डबडबलेल्या आयुष्याला
स्नेहाळ हाताने कुरवाळत असते
सावली आपल्या अस्तित्वाचंच प्रतिबिंब असते

## मी आणि निसर्ग

डोंगरानं डोक्यावर आभाळ उतरवून
उभारलेला डोलारा
माझ्या वास्तव जीवनाच्या ओठावर
पोळलेल्या गरम चहाची फुंकर घातल्यासारखा
क्षणभंगुर वाऱ्याच्या सागर-झुळकेचा आल्हाद...
रानमाळावरच्या
थकून गेलेल्या दगड-धोंड्याच्या डोळ्यात
नित्याचाच—
रक्ताळलेला पश्चिमेचा सूर्य
झाकळलेल्या तलावात रक्तात तुंबणारी
जीवनाची नीरस संध्याकाळ
पाण्यात सडत जाणाऱ्या बोरूच्या काड्यांशी
ताग आणि संकाड्यांच्या
निर्मिती उद्दिष्टांच्या चित्रावर चिंतन करणारी... !
मी निसर्गात अन् निसर्ग माझ्यात ढवळलेला
पिवळ-फुलांच्या घुंगर तालावर बोरूच्या काडीनं
देखाव्यात जीवरस ओतीत... !

## पापण्यांच्या आड

काळीज ओलं करून
जगू नये म्हणणारी
माणसांची औलाद
माणसा–माणसांवर
…सापासारखी फुलारत असते
अन् विश्वासाची चीज
दडवली जाते उघडझाप करून
दिखाऊ डोळ्याच्या पापण्यांच्या आड
तेव्हा बुद्ध गच्च डोळे मिटून घेत असतो
माणसातलं माणूसपण शोधण्यासाठी

## मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराची मनोव्यथा

गेली अनेक वर्षे
शरीराची कमान करून
पाय रोवून उघड्यावरच उभा आहे ज्ञानार्थ्यांच्या स्वागतासाठी
येथल्या दऱ्याखोऱ्यांमधून घोंगावणारे वादळी वारे
उन्हाच्या कडकडत्या झळा, थंडीच्या लाटा
अन् अविरत पावसाचं झेलणं
मला असह्य होतंय.

नुसत्या जन्माचं वयमान वाढत चाललंय
पण प्रतिष्ठेची उंची
लज्जेनं मान खाली वाकवतेय
बाबासाहेबांच्या ज्ञानरूपी सुवर्णमातीचा सुगंध
येथल्या डोंगराळ मातीला सुगंधीत करून गेला
आज येथल्या मातीतले खापरी दिवे
ज्ञानाच्या बळावर पाजळून निघतायेत
पण येथल्या प्रादेशिकतेच्या खोट्या अस्मितेनं
मी आज अस्वस्थ होतोय

माणसाच्या कर्तृत्वाला हीणकसपणाची किंमत देणाऱ्या
लोकांच्या गराड्यात
मी चेंगरला जातोय
ज्ञानाच्या मूळ कार्यकर्त्याला विसरून
प्रादेशिकतेच्या अस्मितेचं काळं मणी
गळ्यात काळोखाचा काळा पट्टा होऊन लोंबकळतंय

खरं म्हणजे माझ्या भाळी हवंय
बाबासाहेबांच्या नावातील कर्तृत्वाच्या
रानगारगोटीतलं चकाकणारं तेज
ज्याने येथल्या मातीतल्या कणाकणांना अधिकच चकाकी दिलीय

पारंपरिक अस्मितेवर माझी उभारणी नाही
मी उभा झालो येथल्या परिसरात मुहूर्तमेढ रोवलेल्या ज्ञानसाधनेवर
याचा विचार होणार की नाही ?

ओठांच्या आत
बाबासाहेबांच्या नावाची लाज वाटणाऱ्या
लोकांचा समूह
मला खालमानेनं अधिकच वाकवतो आहे,
माझ्या पाठीवरील अस्मितेच्या नावानं फुगत जाणारं द्वेषाचं बेंड
हातात ऑपरेशनचं शस्त्र घेतल्याशिवाय फुटणार नाही काय ?
मी तर उघड्यावरच विद्यापीठाच्या आवारासमोर
आमरण उपोषण करीत उभा आहे,
बाबासाहेबांनीच मानवतेच्या मूल्यांचं रक्षण करून
पुढ्यात उपोषणाला बसलेल्या
गांधीजींचा प्राण वाचविलेल्या मार्गानेच चाललोय

मला हवी आहे
सत्यनिष्ठ वाचांवर विश्वास ठेवणारी
कर्तव्यदक्ष, कार्यक्षमतेची शासनाकडून ग्वाही,
लक्षात ठेवा
बाबासाहेबांच्या सुवर्णाक्षरी नावाचं अलंकारकृत तेज
इतर नावांत मुळीच नाही

## पानगळ

कळत नाही
फळं लगडण्याअगोदरच
या उंच झाडाला पानगळ का लागली ते

अलीकडच्या काही दशकांपासून
या झाडाची कळाच बदलून गेली
मेलेल्या माणसांच्या तोंडावर उतरावी तशी

या झाडाचं निरीक्षण करताना दिसतेय
ढेकळांची भरगच्च भर घातलेल्या ओढ्याखाली
जिकडून तिकडून पसरलेली वाळवी
पानापानांवर पसरलेली आढळते आळ्यांची वळवळ
अन् कुरतडल्या पानांवर चढलेला पानरोग

सुतारपक्षाने कोरलेल्या खोडाच्या ढोलीतून
उपद्रवी प्राण्यांचं वास्तव्य वाढीस लागलंय
पानापानांच्या रूपानं उघड्या जमिनीवर ठिपकणारे
या झाडाचे दु:खाश्रू
कोणी थोपवू शकणार नाही काय ?
विज्ञानयुगातली रासायनिक खतं
अन् रक्ताचं पाणी करून झाड वठवता येणार नाही काय ?
सावलीचं सुख न उपभोगता
पुन्हा एकदा कोणी त्यागाचा सोस सोसला
तरच हे झाड बहरून येऊ शकेल
येथलं उन्ह कितीही फांद्यांच्या व पानापानांच्या
त्वचांना चटके देणारं असलं तरी

## घुशी आणि राष्ट्रीयत्व

खैबरखिंडीतून एकाएकी प्रगटलेल्या
वैदिक विचारांच्या घुशींनी
बुद्धभूमीला सर्वत्र पोखरून
स्वत:च्या सुरक्षिततेच्या धर्मांधगुहा
तयार करून ठेवल्या आहेत
खालमानेनं त्या धर्मांधगुहेत
बौद्ध शिकवणुकीच्या चिवट मातीचा
भुगा करण्यात दंग झालेल्या घुशी
दुर्बळ कीटकांचे भक्ष्य खाऊन
काळ्याकुट्ट गेंड्यासारख्या फुगत आहेत
अन् स्वायत्ततेचा शोध घेत
प्रत्येकीने स्वत:ला विखरून घेतले आहे बुद्धभूमीच्या
दिशा-दिशांतून
काही घुशी
बडवेगिरी करण्यासाठी मंदिरात शिरल्या,
काही घुशी
विषमतेचं विष कालविण्यासाठी
राजकारणात तरारल्या,

काही घुशी
समतावाद्यांच्या ताटव्यांनाच पोखरत आहेत,
काही घुशींनी
विनासहासे मिळविलेली संघटनांची बिळं
स्वता:च्यआधि पत्याखाली व्यापली आहेत.

बुद्धभूमीची अमूल्य माती
वाऱ्याच्या ससेहोलपटीत
या प्रदेशातून त्या प्रदेशात अन् त्या प्रदेशातून या प्रदेशात
दिशाहीन होऊन भरकटत असते
तेव्हा घुशी आनंदून जातात
अन् गर्वानं सांगत सुटतात स्वत:लाच मूळ नसलेल्या
ढोंगी राष्ट्रीयत्वाचं नातं.

...खरं तर ढोंगी घुशींनो
तुम्हाला कधी म्हणून समजणार आहे
बोधीवृक्षाच्या छायेतलं प्राणीमात्रांचं कल्याणकारी जीवन,
बुद्धाच्या धम्मतेजानं सळसळणारी पिंपळाच्या पानातली चंचलता
खऱ्या राष्ट्रीयत्वाचा अन् विश्वत्वाचाही जीवनमार्ग सांगताना दिसतेय
ते सारं समजुतीनं ऐकायला लागाल तेव्हा
तुमच्या देहावर संकुचित अंधश्रद्धेनं ताठरलेले काळे केस
नम्र झालेले असतील
'बुद्धम् सरणम् गच्छामि' म्हणताना...!

## ते दिवस

वर्तमानाच्या झुंजार झंजावातानं
घरंगळत गेलीत
भूतकाळातल्या छळवादी तारखांची
अन् क्रूर दिवसांची पानं
बरे झाले...
चैतन्यानं खच्चून भरलेल्या
आरंभी वर्तमान वर्षाचे स्वागत तरी करता आले

पृथ्वीच्या छतावर
नव्या रंग रूपाची उधळण ल्यालेल्या
दिवसाच्या नव्या सोनेरी प्रभेनं
माझ्या दोन्ही डोळ्यांच्या खाचाखाचात रक्तरंग पसरवून
अधिकच दृष्टीबळ प्राप्त करून दिलं आहे
आणि अबोल शब्दांमधलं गूढ
ज्यांना उकलताच आलं नाही त्यांच्यासाठी
आजूबाजूला दिसणाऱ्या बहुरूपी समाजाचं चित्र शब्दबद्ध करून
तारीखवार मांडतो आहे

प्रतिगामी अकलेच्या चिखलात गच्च रुतलेल्या तत्त्ववेत्त्यांना
जळजळीत शब्दांनी शब्दबद्ध केलेला
माझ्या जळत्या कवितांचा आलेख
ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून तरी उपयोगी पडेल
कारण
माझ्या अबोल शब्दांमधलं गूढत्व ते जेव्हा उकलण्याचा प्रयास करतील
ते दिवस
शब्द संशोधनाबरोबर
माझ्या समाजाच्या उत्थानाचेही दिवस असतील
त्यातच माझ्या जगलेल्या जीवनाचा आनंद...!

## वाटचाल

सूर्यापासून चंद्राने
मागावी प्रकाशाची भीक
असं अस्तित्व
येथल्या अंतराळात
स्वत्व कायम राखणाऱ्या
ताऱ्यांचं नाही.

अंधारात
काजव्याने ओंजळीतला प्रकाश सांडावा
तसे ताऱ्यांचे अंतराळात पिठोरी कण न् कण
ओतणारे असंख्य हात
माझ्या बांधवांनीच येथल्या मातीतून
सोनं उकरून आकाशभर उधळावे तसे... !

विराण वाळवंटातले वाळूचे कणही
प्रचंड बांधकामासाठी उपयुक्त ठरलेले
याची नोंद कोठे दिसत नाही
पण हे कबूल करावं लागेल
अंधारात चाचपडणाऱ्या यांत्रिकांनीच
तुमच्या चावडीवर, गढ्यांवर दीपस्तंभ उभे केलेत ते... !

आम्ही तर अंधार पचवणारी माणसं
अंधारात प्रकाश पाजळणारं आमचं सामर्थ्य
येथल्या ग्रहांप्रमाणे तुम्हाला तुमचा प्रकाश असू नये
हे केवढे तुमचे दुर्भाग्य... !

तुम्ही तर येथल्या पायखुरडणाऱ्या पायवाटांवर
पेरला फक्त अंधार
आता आम्हीच वाटू लागलोय ओंजळीनं
प्रकाशाचं दान
तुमच्यातले दातृत्व
अजून किती लांब
त्याचा मृतवेध आम्ही घेत बसत नाही
कारण
पिढ्यापिढ्यांपासून
आमच्या राबलेल्या कष्टकरी तिष्ठित राहणाऱ्या हातानं
तुम्ही तुमच्या सुखी आयुष्याच्या पोतड्या भरून ठेवल्या आहेत
आमची वाटचाल
कोरडी भाकर
चटणी मिठाच्या ढुसण्या देत गिळत आहे
ती पचवायची ताकदही आमच्यात आहे
तुमच्या अग्निकुंडात वितळणाऱ्या देहाचे
कधीच पोलाद झाले आहे
आमची वाटचाल
त्यागाकडून... त्यागाकडे... !

## रस्ता म्हणतो

उंचावले हात आभाळभर
हात कोणाचेच जुळले नाही
येथल्या सूर्य तेजाचं दान ही
माझ्या मुठीत वळलं नाही

टाहो फोडला जीव तोडून
उघडी दारेही बंद झाली
खिडक्यांमधले भेकड जीव
परक्या शब्दानं हीनवत गेली

अनवाणी पायात अडकले पाय
काळेकुट्ट ढग पुढ्यात आले
जीवनमूल्याच्या संघर्षात
दारिद्रय दु:खाशीच झुंजले

नित्य सोबती अंधाराच्या
डोळसपणाचे उघडे हाल
पायाखालचा रस्ता म्हणतो
अरे वेड्या तुडवत चाल

## फोटो

अस्ल्या जीवनाचा फोटो
दात विचकीत हसतो रोजच्या रोज
अशा वेळी माझा फोटो काढून
कोणत्या चित्रसंग्रहालयात ठेवणार आहेस?
संस्कृतीचं विदारक सत्य की नुस्ताच देखावा म्हणून ते तरी सांग?
माझ्या अंगावर परंपरेच्या चिंध्या लोंबकळतात ना
हीच तर आहे
येथल्या संस्कृतीनं छिन्न-विच्छिन्न केलेली अब्रू,

ज्या संस्कृत धर्मपंडितांना माझ्याकडे पाहूनच
माझी शिसारी वाटायला लागते,

अरे! मालक, बापू म्हणून जगलोय
मेहनतीचा निढळा घाम गाळूनही
त्यांच्या विटलेल्या शिळ्या तुकड्यांवर
अशा वेळी माझ्या अडाणी चेहऱ्यावर
स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाचा मानवधर्मी फ्लॅश कॅमेरा
कोणीच का बिंबविला नाही?
मग मला फोटोत बंदिस्त करून चित्रसंग्रहालयाशिवाय
कोणतं म्हणून अधिष्ठान देणार आहेस?
भूतकाळात गडप झालेल्या पूर्वजांचं चित्र तर अजून माझ्या
डोळ्यासमोर आहे

येथल्या अनेक कॅमेऱ्यांत
माया-बहिणींची अब्रू
निगेटिव्ह स्वरूपातच विरली आहे
पोटासाठी पाठीवर किती मार बसला
येथल्या सूर्याला तरी अंधाराशिवाय कुठं माहित आहे ?

तू काढतोसच तर काढ फोटो
पण
येथल्या विशिष्ट समूह गोटाच्या ' हितवादी ' संस्कृतीनं
काडी काडी झालेल्या तळाच्या माणसाला कसं पछाडलं
त्याचं जगासमोर तू चित्र उभं कर,
त्यातून कदाचित निनादेल
आमच्या मृत्युमुक्तिदिनाची घंटा,
तेव्हा तू मात्र
खरा जागतिक चित्रकार असशील
कोणत्याही चित्रकारापेक्षा श्रेष्ठ...!

## आयुष्याची बेरीज जुळवताना

हाताच्या बोटावर
आयुष्याची बेरीज जुळवताना
पुराण-अंक डोळ्याचे हिशोब चुकवीत राहिले.
दिशांच्या भागाकारात...
वैदिक धर्मपंडितांच्या बोलघेवड्या पाढ्यांनी
अनेकदा नाक मुरडले,
रस्त्याच्या दुतर्फा
गुणाकाराच्या संख्येनं वाढलेल्या कडूनिंबाच्या फांद्यांनी
दिलेत हवेच्या प्रदूषणाचे कडवट घोट
आमच्या पिढीजात वाट्याला.

अशाही परिस्थितीत
जोपासला धारदारपणा आम्हीच आमच्या आयुष्यातला
नित्यसोबतीच्या अंधारातल्या कळकट दिव्यावर
लाख लाख शब्द सामर्थ्यांचे आयुष्यमान,
विहारातल्या बुद्ध संस्कारावर पाजळले.

तिढ्यानं वागणारे,
संस्कृतीची शेपटी धरून चालणारे असंख्य आकडे मात्र,
विकृत नाटकी संस्कार-स्नेह सतत जोडत राहिले,
आम्हावर लादलेली चुकीची समीकरणे अन् प्रमेयांची गणिते
कधी सुटतील याचंच चिंतन करतोय
कॉम्प्युटरच्या युगात...?
हाताच्या बोटांवर आयुष्याची बेरीज जुळवताना

३६०४ ३६०८७ क्रमांक ११३।००

## स्वातंत्र्यदिन : एक आनंदोत्सव

भारताच्या क्षितिजावर
स्वातंत्र्याच्या सूर्यानं
किती रक्त ओकलं
हे आजच्या घडीला
बंदिवासात कोंडलेल्या श्वासाची दाहकता ज्यांच्या वाट्यालाही नाही
त्या स्वातंत्र्यावर यथेच्छ ताव मारणाऱ्या
आजच्या शांतिसुतांना काय माहीत ?

स्वातंत्र्याच्या आनंदोत्सवात
पताका फडफडतात खऱ्या
पण माझ्या डोळ्याच्या पापण्याही भीषण अवस्थेत फडफडत आहेत
विजेच्या रोषणाईनं
झगमग झममग करणारे दिवे
जे देशप्रेमियांच्या काळजाच्या कोळशावर पाजळले आहेत.

दोन रुपयाची खादी टोपी डोक्यावर चढवून
भारतमाता की जय म्हणण्याएवढे
स्वातंत्र्य स्वस्त नाही
जीवन मरणाचं आंदोलन ज्यांनी तिरंगा ध्वज लपेटून छातीवर छेललं
अशा वेळी सूर्योदय होऊन सूर्यास्ताकडे कललेल्या
सूर्याच्या काळवटून गेलेल्या चेहऱ्यावर
कुठे आहे स्वातंत्र्याचं तेज ?
तशीच स्थिती तारुण्याचं रक्त सळसळणाऱ्या राष्ट्रप्रेमिकांची

म्हणूनच म्हणतोय
तुमच्या आमच्यातलं ऐक्याचं नातं
अजून किती लांब
वर्षातले दोन दिवस
तिरंगी झेंड्याखाली येऊन राष्ट्रीय प्रतिज्ञेबरोबर
मिठाईचा फराळ झोडला म्हणजे ऐक्य साधत नाही
अक्राळविक्राळ गावकुसाबाहेरच्या रस्त्यावरचे
आर्थिक सामाजिक विषमतेचे खड्डे अजून कोठे बुजले आहेत ?
पोटासाठी जेथले असंख्य हात
दिवाबत्तीशिवाय अंधाराशी झगडत आहेत !

समाजवादाचा ढोंगबाजी
येथल्या लोकशाहीला कळली नाही
तेव्हा या स्वातंत्र्याला, स्वातंत्र्य तरी कसे म्हणू ?
हा तर सत्ता पदरी पडणाऱ्या
मूठभर लोकांचाच आनंदोत्सव...!
पंचतारांकित हॉटेलात बिअरच्या ग्लासमध्ये माणूस क्षणभर
धुंद व्हावा तसा !

## सर्पांचा विळखा

पारदर्शी मुलायम उन्ह-वस्त्र लपेटून
तर कधी काळोखावर स्वतःची दहशत ठेवून
सरपटत असतात विषारी सर्प
तोंडातल्या जिभेचं पातं आत बाहेर फिरवीत
अन् भटकत असतात पालापाचोळ्याला तुडवीत
वासनातृप्तीनंतर दडून बसतात जमिनीच्या बिळात
चांदीच्या धातुसारखे स्वच्छ...नितळ...स्वरक्षित...सुरक्षित...!

अलीकडे
राजरोसपणे लोळत सुटतात रस्त्यारस्त्यांवर
अन् उडतही असतात वाऱ्याच्या धमन्याधमन्यातून
सकाळ...दुपार...संध्याकाळ !

आता
त्यांच्याशी लढावू मुंगूसही भ्यायला लागलीत
जगताहेत मुठीत जीव धरून येथले जीवाणू
आकाश कवेत घेऊन हिंडणाऱ्या घारींच्या
अतिसूक्ष्म उत्तुंग दृष्टीवरही
काजळला असावा का
डोळ्यासमोर काजवे चमकणारा
सर्पांचा विळखा ?

## काळाच्या कराल दाढेखाली

काळाच्या कराल दाढेखाली
जात्यात दाणे भरडावेत तसे या जीविताचे
बारीक कण न् कण
येथील वेगवेगळ्या जाती जातीच्या, मातीमातीत
मातीमोल होत आहेत
सडकं कुजकं खत होऊन
त्यांनी पेरलेल्या बियांना जीवनद्रव्ये पुरविण्यातच
जीवनाची सार्थकता म्हणवीत

किती दिवस झिजावे
येथल्या मातीशी हाडांसवे इमान राखून
आमच्या अवशेषांच्या खनिज संपत्तीवर
शृंगारकृत त्यांच्या जीवनाची सुखद उपभोग्यता

हजारो वर्षांपासून चालवलेली
चोचलेपणाची चाचेगीरी कधी बंद होणार आहे
परंपरागतच नव्हे तर सैद्धांतिक त्यांच्या सत्यनिष्ठेच्या सूत्रानुसार
नव्या भारतीय संविधानाला साक्ष ठेवून

पिढ्यापिढ्यांचं
भूगर्भात दडलेलं आमच्या अनेक जीवांच्या अवशेषांचं द्रव्य मिश्रण
खद्खद्करीत लाव्हा होऊन गर्जत आहे
येथल्या मातीवरचं
ज्यांच्या त्यांच्या जीवन पाठीवरचं दु:खद अन् सुखद वस्तूंचं ओझंही
समतोलपणानंच उचलायला हवं
अन्यत:
अख्ख्या मानव जातीलाच ढकलणे भाग पडेल
काळाच्या कराल दाढेखाली
नव्या माणसाच्या निर्मितीसाठी...!

## ठिगळ

ढुंगणावरची फाटकी पँट बघून
माझी लाज चेहऱ्यावर फुलवीत
करपत जाणाऱ्या बालपणाच्या भोवताल फुललेले मान्यवर प्रौढ चेहरे
आजही माझ्या डोळ्यासमोरून सरकत जातात,
आईनं पँटला लटकवलेली तळव्याच्या आकाराएवढी
चिंध्यांची ठिगळं
दरिद्री जीवनाची खूणगाठ बनतात.

लाचार चिमणदिव्याच्या अंधुक प्रकाशात
माझा बाप म्हणतो—
‘ तुले या दिवाईले कोरी पँट घेईन म्हणतो ! ’
दिवाळी येते अन् जाते
आर्थिक विवंचनेच्या थंडीची हुडहुडी उघड्या अंगाला देऊन
तेव्हा फाटलेली ठिगळा-ठिगळांची गोदडी
बापूचा चेहरा लिंपून घेते.

आणि आई
दिवनाळ्यांसमोर बसून
अश्रूंचं थेंबाथेंबानं तेल ओतीत असते,
त्या अंधारात आईच्या लुगड्याची ठिगळंही
झळकतात पारदर्शक काचेच्या प्रकाशासारखी,
अन् मी
रद्दीतल्या कागदांची घातलेली एक-एक कलात्मक घडी
हाताच्या झटक्यानिशी फटाक्यासारखी उडवीत असतो,
दिवाळी दिवाळी म्हणून बागडताना

ढुंगणावरची फाटलेली पँट
अधिकच फाटत जाते
अन् दारिद्र्य पुन्हा पुन्हा भेटत असते
ठिगळांचीच पुटे चढवल्यागत.

## एक कविता : तीन रूपे

वादीचे पिळदार चऱ्हाट आवळावे तसे
करकचून आवळलेले
पोटातल्या आतड्यांचे दोर
अन् चैतन्य रूपाचं दिव्यतेज ल्यालेली
प्रत्येक श्वासाची दमछाक

भूप्रदेशावर पसरलेल्या अरण्यासारखी
अनादि काळापासून
माणसामाणसांवर
विचार लादलेली समूहांची बेटं
जीवनप्रवाहानं वेढली आहेत
भारतीय संस्कृतीचा वारसा घेऊन

दु:ख दारिद्र्य उधाणले
आयुष्याच्या मडक्यात
पिळ देते सांज-संध्या
पोट कुरतडते रात

## माझा बाप

डोईवरचा पटका फाटकाच फाटका कळकट मळकट धोतर बंडी
माझा बाप कष्ट-जगला उंन्ह वारा पाऊसधारा हुडहुडणारी झेलत थंडी

स्वप्न कधी आभाळून येई फेसाळून येई चांदण्यांसारखे बाळसेदार
हातापायांचे भेगाळ तळवे सोशित राहिले ढाल होऊन अनेक प्रहार

चाण्यांसाठी ओढावी लागली मृत ढोरे टिचभर पोटाच्या खळगीसाठी
माय माझी दावित असे बोट्यानं विटलेली माह्या बापाची कळकट वाटी

जोहार मायबाप जोहार, म्हणत बापू जगला गळ्यास बांधून गाडगे
घडली जन्माचीच चित्तरकथा तरी शब्द झडतात, ' लई माजलेत धेडगे ! '

दणकट बांधा उंच खांदा भरदार मिशांची ओठी लवती कमान
असे व्यक्तिमत्त्व असून बाचे : गुलाम डोळे, गुलाम तोंड न् बंदिस्त कान

बापू कष्टात मेला नोकरीचा पहिला पगारही झाला नव्हता
' बेटा ! बाबांसारखा हो मोठा ! ' मला न्याहाळीत मरताना
चेहरा मात्र फुलला होता.

## स्वागत्याचे स्वगत

माझ्या स्वागतासाठी
तू गुलाबाचा गुच्छ आणलास
ठीक आहे
मी स्वीकारतोय स्वीकारण्याजोगी काही फुलं...
...खरं तर रक्तरंगी गुलाबांचाच स्वीकार करतो
कारण त्याच्या सर्वांगातून
रक्त तेजाळलेल्या पाकळ्यांतून
माझ्याच रक्ताचा सुगंध दरवळतो आहे म्हणून... !

त्यातले पांढरे गुलाब काढून घे
आजच्या समाजढोंगी बगळेधारी पुढाऱ्यांनाच ते द्यायला हवेत
बुद्धशांतीची आजच्या संघर्षमय स्वार्थी जगाला
किती गरज आहे ते त्यांनाच जाणवू दे... !

माझ्या स्वागतासाठी
कशाला वठवलास
झुळझुळत सळसळणारा झगमगाटी बीजप्रवाह
अन् थुंकीतला बेडका अंगावर खाकरून
फेकल्यासारखं ते स्वागत गीत
मला वीट आलाय रे... !
माणुसकीच्या जीवन-कोठारात विष कालवणाऱ्या अमानुषांचा
अशा बेगडी स्वागतात मी गुदमरतोय
पूर्वजांच्या थडग्यासमोरचं माझं व्यासपीठीय मरण

या स्वागताबरोबर
माझ्याच जळत्या घराची राख
माझ्या कपाळी फासलेली अनुभवतो आहे मी
अंगाचा अंगार होऊन... !

## देशाला या वाकवू नका

इतरांवर खूप उपकार करतो असं तुम्ही आम्हाला भासवू नका
लोकशाही तर आताशा कुठं पानं-मुळं धरते आहे
गावच्या पाटलाच्या पायाची चप्पल म्या शिवली...
त्या आनंदाचा मोहर कडवट होऊन कधीच गळला आहे.

उष्ट्या पत्रावळी चाटणारे शूद्र बेईमान झाल्याच्या वल्गना देत
प्रतिगाम्यांनो ! कशाला ढोल पिटवता शासनयंत्रणेच्या भोंग्यापर्यंत
पानापानावरच्या ऐतिहासिक जर्जर जखमा अजून रक्त ओकताहेत
जाणून आहोत तुमची वैदिक मजल स्वार्थापासून स्वार्थापर्यंत

' राखीव जागा बंद करा ' घशाला कोरड येईपर्यंतची ओरड हवीच कशाला
पाचोळा होऊन सोबत लोळवला तूफान होऊन आम्ही हल्ला
तुमच्या बेंबीत का दाटते कळ ! जी हजारो वर्षे आम्ही सोसली आहे
अजून स्वातंत्र्याला फळेफुलेही नाहीत नुस्तीच कुठे वाढ आहे !

स्वातंत्र्य समता बंधुत्वाच्या भीमस्मृतिला अन्याय नको न्याय हवा
कुठं अंथरली जमीन सर्वांसाठी त्याचा थोडा जाब द्यावा
कुठे संपली जातीवृत्ती जो खालचा माणूस समान आहे
राखीव जागांच्या टक्केवारीत कोणत्या वाकळांचं आरक्षण आहे ?

आम्ही स्वाभिमानी भीम शिपाई ओठी स्वातंत्र्याचा आहे निनाद
प्रभावी महार रेजिमेंट हीच तर आमच्या देशप्रेमाची जीवंत दाद
आम्ही खूप केले इतरांवर उपकार असं काही भासवू नका
जाती-धर्माच्या रचून गाठी देशाला या वाकवू नका.

## स्थान

किती रगडलं रक्त
क्षितिजाच्या तळव्याखाली
याची मोजदाद करून
कधीही एकवटला नाही चेहऱ्यावर अग्नीसारखा संताप

जखमी मनावर कुऱ्हाडीचे बसलेले अनेक मनस्वी घाव
ठिपकत आले
विवेक बुद्धिजन्य सूर्य उगवतीच्या किरणांचे रक्ततुषार

झाडाच्या खवल्याखवल्यातून अन् पानापानातून
दु:ख वाऱ्यासारखं सळसळलं
अंतर्मुख होऊन

क्षितिज टेकलेल्या डोळ्याच्या माळावरून
गजबजलेल्या वस्तीतलं
शोध शोध शोधतोय
माझ्या घराचं
नेमकं स्थान... !

## का ?

माझ्यातले हरित स्वप्न पानगळ होऊन झडते आहे
पूर्वापार परंपरेचे, का गळ्यात गाडगे बाकी आहे ?
मी राबतोय
जगतोय
मातीशी इमान राखून,
मला कळत नाही
सभोवतालचं वातावरण
का दूषित होत चाललंय ?
प्रकाशकिरणंही आपले प्रगटीकरणाचे झोत सारून बाजूला सरकतात
अन् डोळ्यासमोर काळोख ढाळणारे ढग—
मनसोक्त हसतात—
माझ्या शब्दाला; माझ्या गतीला,
अन् माझ्या प्रत्येक व्यक्तिगत कृतीलाही.

स्वावलंबी विचाराची पताका खांद्यावर घेऊन येथे चालणेच कठीण झाले

येथल्या परंपरागत समाजव्यवस्थेच्या घटनेतल्या
पहिल्या कलमी पानाने
विकृत मनोवृत्तीच्या खटल्यात गोवून
मलाही आरोपी केले,
हल्ली लोकशाही बड्या बड्यांच्या उकिरड्यावर
गाढवीसारखी लोळते आहे,

माझ्यातले हरित स्वप्न पानगळ होऊन झडते आहे
पूर्वापार परंपरेचे का गळ्यात गाडगे बाकी आहे ?

## कळत नसावे का ?

कळत नसावे का इतरांसाठी काही आपलेही आहे देणे
समस्त समूह गातो त्यांचा स्वतःपुरते जीवन-गाणे

निसर्ग सर्वांसाठी आपण निसर्गाचे हे लख्ख तत्त्वज्ञान पुस्तकात शोभते
अनादिकाळापासूनचे विचारचक्र सोयीस्कर व्यवहार होऊन फिरते
चोचित टिपतात, सोबतही घेतात, घेण्यास जमतील तेवढे दाणे

ना खेद ना खंत येथल्या प्रासादांना भुकेनं किंकाळणाऱ्या झोपड्यांची
म्हणती कशास हवी दखल घेणे घाण्यास जुंपलेल्या बैलांची
जगतात अडवून प्रकाशाला आपल्यापुरतेच जिणे...

भूमितीची प्रमेये सोडवतात गणिती वजाबाकी हातची राखून
दुसऱ्यांच्या ग्लासमध्ये पडलेच जीवन तेही बघतात घोटभर चाखून
जगण्यासाठी खाणे नाही त्यांचे खाण्यासाठी जगणे

जनास येथल्या मातीमधला बुद्ध अजूनही कळला नाही,
या विश्वाच्या अस्तावरून मनु अजूनही ढळला नाही,
वर्गावर्गात ही सुवर्णमाती पुरे करा रे तोलणे

## तक्रार

शासकीय विकास योजनांचे काफिले
बहुजनांच्या उत्थानासाठी
संविधानरूपी संरक्षणयंत्रणेच्या चाकावर धावते ठेवून
तुम्ही आम्हाला खूप काही देऊन गेले,
पण...पाणथळीत
एकविसाव्या शतकाकडे झुकलेली सामाजिकतेची विषपल्लवी
माशांचा जीवनांत शोधणाऱ्या
कोळ्याच्या जाळीसारखी घट्ट पसरलेली
अन् त्या वेलीच्या फांदोऱ्यात
शेतातल्या हरळीसारखी
आमच्या स्वप्नांची लगदाळी
पूर्वापार हाल-अपेष्टांच्या काशा फुटाऱ्यात तशी—
        तोंडगच्च भरलेली
तसेच जगताहेत मुके-अबोल प्राणी
डोळ्यापुढे भवितव्याची दिशा एकवटून
पण बाबासाहेब
सतत चालूच असतं येथे बोचऱ्या काट्यांचं
अन् स्वैर सुटणाऱ्या वाऱ्याचं बोचणं
हीच आमची एक तक्रार

## अस्तित्व

शब्दही पेटत असतात
तेव्हापासून
माझंही मन
पेटाय लागलं
संस्कृतीच्या पायाखाली
गुलामत्वानं चिडलेलं
मनातलं मन
भडकाय लागलं

पोथी...पुराणं
बायबल...कुराण
वाचून काढली
मनुस्मृतीची ग्रंथसंपत्ती
पडताळून पहावयास शिकलो
स्वत:चं स्थान
जाणायलापण शिकलो
वर्णभेद, वर्गभेद, पंथभेद
भेदाभेदांची संस्कृती
जाळायलापण शिकलो,

शब्दही पेटत असतात
तेव्हापासून
माझंही मन
पेटाय लागलं
पेटलेल्या शब्दांनाही
स्वत:चं अस्तित्व
कळायला लागलं.

## नग्नता

जेव्हा तू
ऊन्ह उतरणीच्या माध्यान्हावर आलीस...
...धूळ माखलेला तुझा चेहरा
अन् अब्रू रक्षणासाठी
लपेटलेले आभाळ कवच...
...मी गहिवरून गेलो.
कारण
ज्या रस्त्यावर तू उभी होतीस
त्या रस्त्यांच्या बाजुचे वृक्ष
उभे होते
स्वत:चीच नग्नता प्रदर्शित करत

## दोन चिंतनिका

तू वरती अन् मी खालती
तळामधले धगते जीवन
तुझ्या दिशेचा कडवट वारा
छेड-छेडतो मजला झोंबून

पोत ढगाळ काळी काया
मणी-मण्यांचा करते चुरा
पाणी पाणी जीव जाहला
अंगाभोवती होऊन पारा

## काळीज

जीवाचे कोळसे झालेल्या
काळजाच्या कप्प्याकप्प्यातून
मानवकीच्या सोन्यानं मढवलेलं हे अख्खं अंतरशरीर
शूद्र ठरविल्या जातं
लबाड लफंग्याच्या व्यवहारवादी बहिर्मुखी...
...स्वार्थी बाजारात
मला मांडताच येत नाही
बुजगावण्या सौदेगिरीच्या बाजारात माझं काळीज
मी जगतोय अन् झिजतोय

' माणूस ' नाव कोरलेल्या काळजाचं शिल्प होऊन,
बिना काळजाची गिधाडी माणसं

मला उपहासाने हसत असतात मान उंचावून
खरंच का हे जग काळजावर चालत नाही ?
...तेव्हा माझं दुखरं काळीज
चैतन्यानं पेटून उठतं लाल जांभळं होऊन
रक्त पिंजून घेतल्यासारखा आवाज करीत मला म्हणतं
अरे तुला विधाता व्हायचंय ना ?
अन् खरंच...
काळजाला शब्दा-शब्दांचे घोस लगडले जातात,
तेव्हा डोळयात तरंगणारे दु:खद अश्रूंचे शुभ्र मोती
मी अलगदपणे टिपून घेतलेले असतात.

२६०४
REFBK-0026081
REFBK-0026081

आमची दर्जेदार
प्रकाशने

वडीलधारी माणसे
**शान्ता ज. शेळके**

उर्वशी
**अरुणा ढेरे**

मैत्रेयी
**अरुणा ढेरे**

मंथन
**संपा : चंद्रकुमार नलगे**

चंद्रबनातल्या सावल्या
**चंद्रकुमार नलगे**

आमनेसामने
**केशव मेश्राम**

गाळ आणि आभाळ
**केशव मेश्राम**

रूपोत्सव
**अरुणा ढेरे**

लावण्ययात्रा
**अरुणा ढेरे**

काळोखाचे कवडसे
**अरुणा ढेरे**

सुरेश एजन्सी पुणे

विद्रोही कवितेच्या तिसऱ्या दशकातील एक लक्षणीय कवी म्हणजे देवेन्द्र खंडारे. वऱ्हाडातील काळ्या मातीचा कलदार कस त्यांच्या कवितेत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नवविचारांचा आणि भगवान गौतमबुद्धांच्या विश्व-प्रकाशी तत्त्वज्ञानाचा झरा, ह्या कवीला आतून लाभला आहे. व्यक्तिगत जीवनाचे उत्खनन करीत असतानाच त्यांची कविता सर्व शोषितांच्या वेदनांचे वळ, भूषणासारखे पाठीवर मिरवते. कधी आसूडांच्या फटत्कारांनी संस्कृतीचे विपर्यस्तत्व दाखविते, तर पूर्वपिढ्यांचे दास्य सांगतानाच भविष्याच्या वास्तव स्वप्नांचे नीलमणीही ती मिरवते.

वऱ्हाडी बोलीच्या ठसक्यांनी त्यांचे शब्द भावाशय पेलून धरतात. स्वतःला गहाण ठेवायला नाकारलेल्या पिढ्यांची मशाल मिरवणारा हा कवी, जशी थेट अभिव्यक्ती करतो; तसेच संसूचन क्षमताही मोठ्या प्रमाणात प्रकट करतो. स्वतंत्र देशावर आणि स्वातंत्र्यावरील प्रा. देवेन्द्र खंडारे यांचे चिंतन मूलगामी आणि अंतर्मुख करणारे आहे. नव्या मूल्यांचा शोध घेणाऱ्या या 'दस्तऐवज'ने अस्वस्थतेचे पाणी आपल्या लेखणीला चढवले आहे याचा प्रत्यय ही कविता निश्चितपणे देते.

— डॉ. सदा कऱ्हाडे